**ठळक बातम्या**

- गगनयान मोहिमेसाठी आवश्यक असलेलं तंत्रज्ञान, भारत वेगाने विकसित करत असून लवकरच गगनयान अंतराळात झेपावेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- स्टेट बँक कर्ज फसवणूक प्रकरणी अनिल अंबानी यांच्याशी संबंधित आस्थापनांवर सीबीआयचे छापे

- बिहारच्या पाटणा इथं झालेल्या अपघातात किमान आठ जण ठार, पाच जण गंभीर जखमी

**आणि**

- जम्मू काश्मीरमधे दल सरोवरात सुरू असलेल्या खेलो इंडिया जलक्रीडा स्पर्धेचा समारोप

**<><><><><>**

गगनयान मोहिमेसाठी आवश्यक असलेलं तंत्रज्ञान, भारत वेगाने विकसित करत असून लवकरच गगनयान अंतराळात झेपावेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. दुसऱ्या राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या निमित्ताने त्यांनी देशाला संबोधित केलं. गेल्या काही काळांत अंतराळ क्षेत्रात भारतानं केलेल्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख आणि भविष्यातल्या मोहिमांचं सूतोवाच करताना ते म्हणाले,

***होल्ड... बाइट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी (३० सेकंद)***

‘आर्यभट्ट ते गगनयान’ ही या वर्षीच्या अंतराळ दिवसाची मध्यवर्ती संकल्पना असून यात भूतकाळाचा आत्मविश्वास आणि भविष्याचा संकल्प आहे, असं ते म्हणाले. अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातल्या देशाच्या प्रगतीमुळे सामान्य नागरिकांच्या जीवनात

अमूलाग्र बदल घडत असून कृषी, मासेमारी, आपत्ती व्यवस्थापन, कनेक्टिव्हिटी इत्यादी क्षेत्रांमध्ये हे क्षेत्र मोठं योगदान देत आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. गेल्या ११ वर्षांत अंतराळ क्षेत्रात केलेल्या विविध सुधारणांची माहिती त्यांनी दिली. या क्षेत्राची दारं खासगी क्षेत्रासाठी उघडल्यामुळे सध्या ३५० स्टार्टअप्स या क्षेत्रात काम करत आहेत, असं मोदी यांनी सांगितलं. पुढच्या ५ वर्षांत अंतराळ क्षेत्रातले ५ युनिकॉर्न उभारायचं आणि प्रत्येक वर्षी ५० रॉकेट्सचं प्रक्षेपण करायचं ध्येय ठेवावं, असं त्यांनी सुचवलं. त्यासाठी या क्षेत्रात अत्याधुनिक सुधारणांची गरज असून त्या सुधारणा करण्याचा सरकारचा उद्देश आणि इच्छाशक्ती आहे, अशी ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

चांद्रयान २ मोहिमेतून मिळालेल्या माहितीच्या आधारे आयआयटी मुंबईतल्या विद्यार्थ्यांनी चंद्राच्या पृष्ठभागावर उपलब्ध असलेल्या रसायनांचे नकाशे तयार केले आहेत. इस्रोच्या मदतीनं देशभरातल्या आयआयटींनी आयोजित केलेल्या स्पर्धेत आयआयटी मुंबईच्या विद्यार्थ्यांनी पहिलं स्थान पटकावलं. स्पर्धेत मिळालेल्या यशावर न थांबता, या विद्यार्थ्यांनी यावर आणखी विस्तृत संशोधन केलं, ज्याचा उपयोग भविष्यातल्या चांद्र मोहिमांसाठी होणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया त्यांचे प्राध्यापक वरुण भालेराव यांच्याकडून.

***होल्ड... बाइट- वरुण भालेराव (२६ सेकंद)***

विद्यार्थ्यांनी केलेलं हे संशोधन प्लानेटरी सायन्स जर्नलमध्ये प्रकाशित होण्याची प्रक्रिया सुरू आहे. हे नकाशे आणि इतर माहिती आयआयटी मुंबईच्या वेबसाइटवर चांद्रयान नावानं उपलब्ध आहे.

**<><><><><>**

इस्रो, अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं हवामानाच्या स्थितीची अचूक माहिती देण्यासाठी एक भौगोलिक-पोर्टल विकसित केलं असून, त्याच्या

मदतीनं शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांचं अधिक प्रभावीपणे नियोजन करता येईल, असं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी आज सांगितलं. ते आज नवी दिल्ली इथं राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला दूरस्थ पद्धतीनं संबोधित करत होते. शेतकऱ्यांना सहाय्य करण्यासाठी भारतीय अंतराळ शास्त्रज्ञांनी दिलेल्या योगदानाची त्यांनी यावेळी प्रशंसा केली.

**<><><><><>**

अवकाश क्षेत्र खासगी क्षेत्रासाठी खुलं करणं, ही गेल्या अकरा वर्षांमधली सर्वात मोठी सुधारणा असल्याचं, केंद्रीय अंतराळ राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

**<><><><><>**

राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त, भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी आज नवी दिल्ली इथल्या नेहरू तारांगणात आर्यभट्ट राष्ट्रीय अंतराळ दिनानिमित्त, आर्यभट्ट गॅलरीचं उद्घाटन केलं. देशाच्या युवा पिढीला उत्सुकता जोपासण्यासाठी आणि आपली स्वप्नं पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिलं. देशाची स्वप्नं अत्यंत महत्वाकांक्षी आहेत, त्यामुळे लोकांची स्वप्न प्रत्यक्षात उतरायला मदत मिळेल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारत आणि अमेरिके दरम्यान व्यापार विषयक वाटाघाटी अद्याप सुरु असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं ' इकॉनॉमिक टाईम्स वर्ल्ड लीडर्स फोरम २०२५ ला संबोधित करत होते. देशातले शेतकरी आणि लघु उत्पादकांच्या हिताचं रक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं ते यावेळी म्हणाले.

अमेरिकेबरोबरच्या वाटाघाटींमध्ये भारताला आपल्या मर्यादांची स्पष्ट जाणीव असून, देशहित लक्षात घेऊनच कोणताही निर्णय घेतला जाईल, असं त्यांनी स्पष्ट केलं. अमेरिकेनं भारताच्या तेल आयातीवर निर्बंध लादले असले, तरी सर्वात मोठा तेल आयातदार असलेल्या चीनला मात्र त्यामधून वगळल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

सीबीआयनं आज मुंबईत अनिल अंबानी आणि रिलायन्स कम्युनिकेशनच्या कार्यालयावर छापे टाकले. स्टेट बँकेकडून कर्ज घेतलेल्या सुमारे २ हजार ९०० कोटी रुपयांच्या कर्जाप्रकरणी मुंबईत हे छापे पडले. १३ जून रोजी स्टेट बँकेनं रिलायन्स कम्युनिकेशनला दिलेलं कर्ज 'फसवणूक' या श्रेणीत वर्ग केलं होतं. कर्जाच्या रकमेचा गैरवापर केल्याचा बँकेचा दावा आहे.
१७ हजार कोटींच्या कर्ज घोटाळा प्रकरणी काही दिवसांपूर्वी ईडीनं अनिल अंबानी यांचं कार्यालय आणि इतर ठिकाणी छापे टाकून काही वस्तू जप्त केल्या होत्या, तसंच त्यांची चौकशी केली होती.

**<><><><><>**

बिहारमधे पाटणा इथं आज सकाळी झालेल्या अपघातात आठ जण मृत्यूमुखी पडले, तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. दानियावान इथल्या राज्य महामार्गावर ऑटोरिक्षाला ट्रकनं जोरदार धडक दिल्यानं हा अपघात झाला. अपघातातल्या जखमींना पाटणा इथल्या रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये श्रीनगरच्या दल सरोवरात गेले तीन दिवस सुरु असलेल्या खेलो इंडिया जलक्रीडा स्पर्धेचा आज समारोप झाला. यात नौकानयन, कयाकिंग आणि कनोइंग स्पर्धांचा समावेश होता. मध्य प्रदेशचा संघ १८ पदकं मिळवून प्रथम स्थानावर आहे. ओडिशा आणि केरळ अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत. महाराष्ट्र २ पदकांसहित आठव्या स्थानावर आहे.

भारतीय क्रीडा प्राधिकरण तसंच जम्मू आणि काश्मीर क्रीडा परिषदेतर्फे ‘खेलो इंडिया’ उपक्रमाअंतर्गत प्रथमच या जलक्रीडा स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं होत.

**<><><><><>**

उत्तराखंडमधल्या चमोली जिल्ह्यातल्या थरली तालुक्यात काल रात्री उशिरा झालेल्या मुसळधार पावसानंतर जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुसळधार पावसामुळे तुनरी नदीच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून थरली बाजार परिसरातल्या काही भागांतल्या घरांमध्ये पाणी आणि कचरा शिरला आहे. मदत आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरु असून येत्या दोन दिवसात राज्यातल्या अनेक भागांमध्ये अतिवृष्टी होण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.

**<><><><><>**

तामिळनाडू सरकारने गुन्हेगारांना शिक्षा म्हणून समाजसेवेचे १६ प्रकारचे पर्याय देण्याच्या उपक्रमाला मंजुरी दिली आहे. त्यात रुग्णालयांची आणि शाळांची सफाई, ग्रंथालयांचं व्यवस्थापन, सार्वजनिक बागा ,संग्रहालय आणि समुद्रकिनाऱ्याची देखभाल, इत्यादींचा समावेश असणार आहे. प्रत्येक गुन्हेगाराच्या शिक्षांचं स्वरूप आणि कालावधी न्यायालय ठरवणार असून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी त्या त्या ठिकाणी पोलीस अधिकारी देखरेख करतील.

**<><><><><>**

सीसीपीए अर्थात केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरणानं चरबी किंवा वजन कमी करण्याचा दावा करून दिशाभूल करणाऱ्या जाहिराती प्रकाशित केल्याबद्दल एका सौंदर्यप्रसाधन कंपनीवर तीन लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. अशा बनावट

जाहिराती ग्राहकांसाठी अन्याय्य असल्याचं, ग्राहक व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

जीएसटी परिषदेची ५६वी बैठक येत्या ३ आणि ४ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असतील.

**//<><><><><>//**